## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ ची साक्ष

## निशाणी क्र. ०८

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

नाव – किरण श्रीराम पाटील,

वय – ५१ वर्षे,

व्यवसाय – शेती,

राहणार – रहिमपुरा, ता. शिंदखेडा, जि. धुळे,

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. सी. पी. चव्हाण यांचे मार्फत.**

०१. दि. ०६.०६.२०१८ रोजी माझा पुतण्या यशवंत मिठाराम पाटील व त्याचे सोबत जगन विक्रम पाटील हे बियाणे घेवुन दोंडाईचाहून रहिमपुराकडे निघाले. ते धुळे रस्त्याने येत होते. अपघात संतोष पेट्रोल पंपांच्याबाजुला झाला. अपघात ४०७ गाडीने झाला. सदर गाडीचा नंबर एम.एच.–१८–एम.–३५४९ असा होता. माझा पुतण्या दवाखान्यात जाण्याच्या अगोदर मयत झाला होता. दुसरा व्यक्ती हा गंभीर झाला होता. मी कॉटेज हॉस्पिटल, दोंडाईचा येथे आलो होतो. त्याच्या डॉक्टरांनी यशवंत मिठाराम पाटील हा मयत झाला असल्याचे व जगन विक्रम पाटील याला उपचाराकरीता धुळे येथे पाठविल्याचे सांगितले. पोलीस स्टेशन येथे मी व मयताचा भाऊ अशांनी तक्रार दिली होती. ४०७ गाडी ही प्रमोद लोटन पाटील चालवित असल्याचे पोलीस स्टेशन येथे समजले व त्यावेळेस ती व्यक्ती पोलीस स्टेशन येथेच होती. मी सदर व्यक्ती पाहिल्यास ओहखु शकेन. सदर व्यक्ती आज रोजी न्यायालयासमक्ष हजर आहे. (साक्षीदाराने न्यायालयासमक्ष हजर असलेल्या आरोपीकडे अंगुलीनिर्देश केला.) मी पोलीस स्टेशन येथे सदर घटनेबाबत जबाब दिला होता. मी पोलीस स्टेशन येथे खरी घटना कथन केली होती.

०२. अपघातातील मोटारसायकल पोलीसांनी माझ्या ताब्यात दिली होती. ती मोटारसायल हिरो होंडा कंपनीची होती. मला सदर मोटारसायकलचा नंबर सांगता येणार नाही.

ती पोलीसांनी वाहन ताब्यात दिल्याच्या पावतीवर दिली होती.(आता साक्षीदारास प्रस्तुत खटलयातील वाहन ताब्यात दिल्याची पावती दाखविण्यात आली.) आता मला दिलेली पावती तीच आहे. त्याच्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदर वाहन पावतीस **नि. क्र. ०९** देण्यात येते.)

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. जी. पाटील यांचे मार्फत.</u>**

०३. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताची घटना घडली त्यावेळेस मी रहिमपुरा येथे माझ्या घरी होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे अपघात नेमका कसा घडला व कशामुळे घडला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, बातमी मिळाल्यावर मी लगेच रहिमपुऱ्याहुन सिव्हील हॉस्पिटल येथे गेलो. हे म्हणणे खरे आहे की, दोंडाईचा येथुन रहिमपुरा येथे जाण्याकरीता विखरण मार्गे एक व धमाणे मार्गे दुसरा असे दोन रस्ते आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपघातातील मोटारसायकल ही माझ्या मालकीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, पुतण्या यशवंत मिठाराम याच्याकडे वाहन नव्हते. पुतण्या यशवंत मिठाराम याच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना होता किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, यशवंत मिठाराम यांस अधुनमधुन दारु पिण्याचे व्यसन होते.

०४. अपघातामध्ये गाडीचे नुकसान झाल्यास त्याची दुरुस्ती करुन घेण्याकरीता केस करावी लागते हे मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा पुतण्या यशवंत मिठाराम यांस व अपघातातील जखमी जगन विक्रम यांच्याबाबत नुकसानभरपाई मिळण्याकरीता केस करावी लागते हे मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, मयताबाबत व गाडीच्या नुकसानाबाबत भरपाई मिळावी याकरीता मी व माझा मोठा पुतण्या ज्ञानेश्वर मिठाराम असे पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्याकरीता गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही दोघे व आमचे इतर नातेवाईक अशांनी मिळुन सल्लामसलत करुन तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे

आहे की, ४०७ गाडीबाबत व आरोपीच्या नावाबाबत मला पोलीसांकडून समजले. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रमोद लोटन पाटील यांस पोलीस स्टेशन येथे पहिल्यांदा पाहिले असुन त्यावरुन मी त्याला आज न्यायालयासमक्ष ओळखले आहे.

०५. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०६.०६.२०१८ रोजी माझा पुतण्या यशवंत मिठाराम व जगन विक्रम हे रहिमपुऱ्याकडे येत असतांना धुळे रस्त्यावर संतोष पेट्रोलपंपाच्या बाजुला त्यांचा एम. एच.–१८– एम–३५४९ या ४०७ गाडीने अपघात झाला व त्यामध्ये पुतण्या यशवंत मिठाराम हा मयत झालाव जगन विक्रम हा गंभीर जखमी झाला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर वेळेस प्रमोद लोटन पाटील हा पोलीस स्टेशन येथे हजर होता हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा जबाब घेतल्याचे व मी त्यांना खरी घटना कथन केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताची घटना घडली त्यावेळेस ज्ञानेश्वर मिठाराम हा देखील माझ्यासोबत रहिमपुरा येथे घरीच होता. हे म्हणणे खरे आहे की, बातमी मिळाल्यावर आम्ही दोघे सोबत सिव्हील हॉस्पिटल येथे गेलो. हे म्हणणे खरे नाही की, ४०७ गाडी व आरोपी प्रमोद लोटन पाटील याचा अपघाताच्या घटनेशी कोणताही संबंध नसतांना मी चुकीचा जबबा देवुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ नुकसानभरपाई मिळावी व माझ्या वाहनाचा इंशुरन्स मंजुर व्हावा याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2024.11.08 17:40:17 +0530

दिनांक : ०८/११/२०२४
स्थळ : दोंडाईचा

(आदित्य घ. नाईक)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – गणेश साईनाथ अहिरे, लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नांव | – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – ०८.११.२०२४ |

स्वाक्षरित/–
लघुलेखक.